निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील सदस्य/थेट सरपंचाच्या रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणूकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम..

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.१/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०२/०५/२०२३

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय :- निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील सदस्य/ थेट सरपंचाच्या रिक्त झालेल्या जागांच्या पोटनिवडणूकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा निवडणूक कार्यक्रम

संदर्भ :- १. आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ०६/०४/२०२३ चे पोट निवडणूक कार्यक्रम आदेश.
२.सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १, दिनांक २८/०४/२०२३

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या उक्त संदर्भ क्र. १ येथील आदेशान्वये राज्यातील निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील सदस्य/ थेट सरपंचाच्या रिक्त झालेल्या जागांसाठी पोटनिवडणूकीचा कार्यक्रम देण्यात आला आहे. या कार्यक्रमानुसार दिनांक २५/०४/२०२३ ते दिनांक ०२/०५/२०२३ हा नामनिर्देशनपत्र सादर करण्याचा कालावधी असून नामनिर्देशनपत्र छाननीचा दिनांक ०३/०५/२०२३ हा आहे.

सदर आदेशातील मुद्दा क्र. ५ मध्ये सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४, दिनांक २० जानेवारी, २०२२ नुसार ज्या व्यक्तीला नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत वैधता समितीकडे अर्ज सादर केल्याचा पुरावा आणि ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या आत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील असे हमीपत्र सादर करण्याची मुभा संपुष्टात आल्यामुळे आता, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० - १अ (१)नुसार राखीव जागेसाठी निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने नामनिर्देशनपत्राबरोबर सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे, असे नमूद केले आहे.

परंतु शासनाने संदर्भ क्र. २ येथील सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १, दिनांक २८/०४/२०२३ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० - १ क व ३० - १ क नुसार सुधारणा केली असून आयोगाने जाहिर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा शेवटचा दिनांक हा ३१ डिसेंबर, २०२३ किंवा त्यापूर्वीचा असेल त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असूल, परंतु जिला नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत नामनिर्देशनपत्रासोबत वैधता समितीकडे अर्ज सादर केल्याचा पुरावा आणि ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकांपासून बारा महिन्यांच्या आत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील असे हमीपत्र सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे.

त्यामुळे अधिनियमातील उक्त सुधारणेनुसार आयोगाने दिनांक ०६/०४/२०२३ रोजी दिलेल्या निवडणूक कार्यक्रमामध्ये नामनिर्देशनपत्रासोबत वैधता समितीकडे अर्ज सादर केल्याचा पुरावा आणि ती निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकांपासून बारा महिन्यांच्या आत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करील असे हमीपत्र सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त, यांच्या आदेशानुसार.

आपला,

(के. सुर्यकृष्णमूर्ती)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र